अत्यंत महत्वाचे

यशवंतराव चव्हाण भवन,
पुणे जिल्हा परिषद [शिक्षण विभाग]
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-५/दा तु/९०-९१
पुणे - १ दिनांक : १४/८/९०

प्रति
मा. मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
नंदादीप माध्यमिक विद्यालय (१००१)
पुणे - ९

विषय : १९९०-९१ मध्ये मान्यता प्राप्त माध्यमिक शाळांतील वर्गवार तुकड्यांना मंजुरी बाबत

महोदय/महोदया,

मा. शिक्षण संचालक, म.रा. पुणे १ यांचेकडील पत्र क्र. अमाशा/१०१०/जा.तु./१४-क/दिनांक १२-६-९० अन्वये या कार्यालयाचे जा.क्र. शिक्षण माध्य-ह-५/शि.वि./दिनांक ४-३-९० अन्वये सन ८९-९० मधील डिसेंबर ८९ ची तुकडी त्यांच्या पटसंख्या व हजर सरासरी बाबतची माहिती "अ" व "ब" प्रपत्रात मागविण्यात आलेली होती. त्यांची छाननी करण्यात आली तसेच ९०-९१ करिता पुणे जिल्ह्यातील मा. शिक्षण संचालक म.रा. पुणे १ यांनी मंजूर केलेल्या तुकडयांची संख्या व आर्थिक तरतूद विचारात घेऊन आपले मंजूरी बाबतची मान्यता देण्यात आहे. शाळेस खाली नमूद केल्याप्रमाणे ९०-९१ सालाकरिता तुकडी ------ मंजूर करण्यात येत आहे.

१] सन ८९-९० मध्ये आपले शाळेत मंजूर असलेल्या तुकडयांची संख्या व विद्यार्थी संख्या लक्षात घेता सन ९०-९१ करिता इयत्ता ची तुकडी कमी करून इयत्ता ची तुकडी देण्यात येत आहे.

२] इयत्ता ५ वी ते ७ वी या वर्गाच्या १९८९-९० मध्ये मंजूर केलेल्या तुकडयांच्या प्रमाणातच विहीत संख्येनुसार दाखल करू नयेत, सदर विद्यार्थी जिल्हा परिषद, प्राथ.शाळा, नगरपालिका या शाळेत वाढविणे कार्यवाही करण्यात यावी.

३] सन ८७-८८, ८८-८९, ८९-९० मध्ये आपले शाळेस नव्याने मान्यता मिळाल्याने सन ९०-९१ करिता नैसर्गिक वाढ म्हणून मान्यता चे वर्ग सुरु करण्यात मान्यता देण्यात येत आहे.

४] सन ८९-९० मध्ये मंजूर झालेल्या तुकडयांपैकी सन ९०-९१ करिता इयत्ता ची तुकडी कमी करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सन | इ. ५वी | ६ वी | ७ वी | ८ वी | ९वी | १० वी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १] | १९८९-९० तुकडया | – | – | – | 3 | 2+1 | 1+1 | 6+2 (+) |
| २] | १९९०-९१ तुकडया | – | – | – | 3 | 2+1 | 1+1+1 | 6+3 (A) |

मंजूर तुकडयांच्या व्यतिरिक्त जादा तुकडया कोणत्याही परिस्थितीत चालू ठेवू नये, मंजूर नसलेल्या तुकडयांचे संबंधित शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा पगारात तसे नामंजूर तुकडयांतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस शासन कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

(*) विना अनुदान तत्वावर

आपला विश्वासू,

शिक्षणाधिकारी [माध्य.] जिल्हा
परिषद, पुणे करिता.

प्रत

९८५९/२१

...माध्य ...(२५)/५ ते ७/...२००८- ...
...उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक :

प्रति,

शिक्षणाधिकारी, (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे.

**विषय** : **इयत्ता ५ वी ते ७ वी चे वर्ग प्राथमिक विभागाकडून माध्यमिक विभागाकडे वर्ग करण्यांस परवानगी बाबत. . .**
**शाळा:- समाजभूषण बाबुराव फुले माध्य. विद्यालय, पर्वती, पुणे-४११ ००९.**

**संदर्भ** : **१. आपले पत्र क्रमांक : दि.१९/१/२००९.**
**२. शासन निर्णय क्रमांक एसएसएन-१००२(२५६/२००२)/माशि-१**
**दिनांक :- २७.६.२००३**

उपरोक्त विषयाधिन संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, १९८३-८४ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी दिलेल्या नविन माध्यमिक शाळांना इ. ५ वी ते ७ वी चे वर्ग नव्याने सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत शासनाचे पत्र क्रमांक-एस्.एस्.एन्.-१०९७/५२८/९९/माशि-१, दिनांक-१.३.१९९९ व शासन निर्णय क्रमांक एस्.एस्.एन्.-१००२/(२५६/०२) माशि-१, दिनांक २७.६.२००३ चे शासन आदेशानुसार विभागीय शिक्षण उपसंचालकांना प्रदान केलेल्या अधिकाराचे अधिन राहून खालील अटींची पूर्तता करणेचे शर्तीवर नंदादीप एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या समाजभूषण बाबुराव फुले माध्य. विद्यालय या माध्यमिक विद्यालयास इयत्ता ५ वी ते ७ वी चे वर्ग प्राथमिक विभागाकडून माध्यमिक विभागाकडे वर्ग करण्यांस शैक्षणिक वर्ष २००८-०९ या शैक्षणिक वर्षापासून आहे त्या परिस्थितीत वर्ग करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

१. इयत्ता ५ वी ते ७ वी चे वर्ग भविष्यामध्ये प्राथमिक शाळेस मंजूर केले जाणार नाहीत.
२. माध्यमिक शाळा संहिता नियम ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता शाळेने करणे आवश्यक आहे.
३. वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश/नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.
४. प्राथमिक विभागाकडील मंजूर शिक्षक संख्या वर्ग माध्यमिक विभागाकडे वर्ग केल्यानंतर तीच राहील. जादा शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी मंजूर केले जाणार नाहीत.

वरील प्रमाणे संबंधितांस कळवावे. शाळेने सुरु केलेल्या सदर वर्गाची तपासणी वार्षिक तपासणीच्या वेळी करावी व त्या बाबतचे योग्य ते अभिप्राय तपासणी अहवालामध्ये नमूद करावेत.

(सही)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

करिता विभागीय शिक्षण उपसंचालक
यांची स्वाक्षरी आहे.

TRUE COPY
Balkawade
कार्याध्यक्ष
नंदादीप एज्युकेशन सोसायटी
पर्वती, पुणे-४११ ...

प्रतिलिपी -

१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ३२.
२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे.
३. मुख्याध्यापक, समाजभूषण बाबुराव फुले माध्य. विद्यालय, पर्वती, पुणे-४११ ००९.
४. निवडनस्ती

मुख्याध्यापिका
समाजभूषण बाबुराव फुले
माध्यमिक विद्यालय

Scanned with OKEN Scanner